REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER – 2017

# सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवन व कार्याचा अभ्यास

**Prof. Gorakh Vithal Rupnavar**
**Head Department of History Art, Commerce college Dound, Dist. Pune.**

## १. प्रस्तावना :

सरदार वल्लभभाई पटेल यांच विशाल भारतीय राष्ट्राच्या एकिरणाच्या महान कार्यामुळे 'बिस्मार्क' म्हणून ओळखले जाते. खरोखरच जर्मनीच्या बिस्मार्कबरोबर सरदार वल्लभभाई पटेल यांची तुलना करणे ही त्यांच्या कार्यामुळे योग्य ठरते. परंतु काही बाबतीत सरदार वल्लभभाई पटेल हे हे बिस्मार्कपेक्षाही श्रेष्ठ ठरतात. बिस्मार्कची कार्यपध्दती आणि त्याचे यश व सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्यपध्दती आणि त्यांच्या यशाची साधने भिन्न होती. दोन वेगवेगळ्या मार्गाने जाणारे हे राष्ट्रपुरूष जो एक हिंसेच्या मार्गाने जाणारा, तर एक अहिंसेच्या मार्गाने मार्गक्रम करून एकाच लक्षापर्यंत पोहचलेले दिसतात. जर्मनीमध्ये रक्तपात, हिंसेच्या नंतर बिस्मार्कला आपलया उद्देशांमध्ये सफलता मिळालेली दिसते. परंतु सरदार वल्लभभाई पटेल यांना मिळालेले यश हे त्यांच्या अहिंसा तत्वज्ञानामुळे मिळालेला एक अध्यात्मिक विजय आहे. आधुनिक इतिहासात सरदार वल्लभभाई पटेल यांचे नेतृत्व एक असामान्य मानले जाते.

## २. सरदार वल्लभभाई पटेल यांचे जीवन व कार्य :

आधुनिक भारताच्या प्रमुख व्यक्तीमत्वांमध्ये सरदार वल्लभभाई पटेल आणि पंडीत जवाहरलाल नेहरू या दोन्ही प्रमुख राष्ट्रपुरूषांचे राष्ट्रीय एकता आणि निर्मितीमध्ये सर्वांगीन योगदान आहे. एकाने राष्ट्राची प्रगती केली, तर एकाने तेच राष्ट्र गतीमान केले. पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी स्वत: सरदार वल्लभभाई पटेल यांना 'राष्ट्रीय एकतेचे शिल्पकार' असे म्हटले होते. सरदार पटेलांना स्वातंत्र्यानंतर जवळ—जवळ साडेतीन वर्षांचे आयुष्य लाभले. याच काळात त्यांनी आपल्या इच्छ — आकांक्षा आणि आपली जबाबदारी यांना अतिशय कौशल्याने पार पाडले. त्योच जीवन यशाची एक अशी गोष्टच आहे की, त्यांनी हातात घेतलेल्या कोणतयाही कामात त्यांना अपयश आले नाही. देशभक्ती, राष्ट्रसेवा, आदर्शांच्या प्रती निष्ठा आणि नेतृत्वाप्रतीही निष्ठा या कारणांमुळे सरदार पटेल यशापर्यंत पोहचू शकले. पंडीत नेहरू आणि सरदार पटेल यांच्या विचारांमधील अंतर मिठ—मसाला लावून त्याकाळात लोकांसमोर प्रदर्शित केले जात होते. त्याचबरोबर राजनैतिक चालबाजपणा करून लोकांना फसविणे यांसारखे खालच्या पातळीवरील प्रयत्नही केले जात होते.

त्यामुळे असा आभास निर्माण झाला की, सरदार पटेल व पंडीत नेहरू यांच्यामध्ये संघर्ष होणे आता अटळ आहे. परंतू अशा विकृत बाबींपासून हे दोघेही राष्ट्रपुरूष सावध होते. सरदार पटेल आणि पंडीत नेहरू यांच्यातील संबंधांबाबत पटेल ०३ ऑक्टोबर १९४८ रोजी नवी दिल्ली येथे आयोजित एका सभेत म्हणतात की, ''मी हिंदुस्तानात राहणाऱ्या सर्व लोकांना, विशेषकरून सांगतो की, तुम्ही अस समजू नका की सरकार हे प्रस्थापितांचे आहे, भांडवलदारांचे आहे, सतत आपल्याला या बाबी सांगितल्या जातात. मजुर म्हणुन काम करणारे आमचे अनेक मित्र जे आमच्याबरोबर नसतात ते स्वत:चा वेगळा गट निर्माण करतात. सध्या आपले प्रमुख जे पंतप्रधान आहेत, तेच ट्रेड युनियन काँग्रेस पहिले अध्यक्ष होते. ज्यांनी त्याची सुरूवात केली त्यांच्यासारखे मजुरांचे हित बघणारा नेता मी कधीच पाहिला नाही. आज जेंव्हा केंव्हा काही लोक म्हणतात की, पंतप्रधानांच काही चालत नाही, शासनात दोन पाट्र्या आहेत. कोत्यामनाची



आणि वेडे लोकच अशा गोष्टी बोलतात. त्यांना अस वाटत की, आम्ही वेडे आहोत आणि आम्ही देशाच्या स्वातंत्र्यासाठी जीवनभर एकत्र राहून आता आपआपसात झगडा करू आणि दोन गट निर्माण करू. परंतु जर मी माझ्या नेतृत्वाला मजबुत उभा करू शकलो नाही तर एक मिनिटही मी सरकारमध्ये राहणार नाही. अशा प्रकारची फसवणुक करणे माझ्या स्वभावातच नाही. कारण ज्या नेतृत्वाकडून राष्ट्रसेवेचा धर्म मी शिकलो आहे, आणि त्यामध्येच जर माझ्याकडून फसवणुक होत असेल तर मला आत्महत्या करावयास हवी. परंतु कोत्या मनाची माणस अशा गोष्टी सतत करत असतात. साधी भोळी माणस अशा लोकांचेच ऐकतात. कधी – कधी एखाद्या बाबीवर आम्ही दोघेही आमची वेगवेगळी मतेही मांडतो. प्रत्येक गोष्टीत आम्ही एकमेकांबरोबर चर्चा करत असतो. नाहीतर राष्ट्राची एकत्रीत जबाबदारी पार पडू शकत नाही'' सरदार वल्लभभाई पटेल यांचे वरील वक्तव्याने फक्त त्यांचे स्वत:चेच नाही तर पंडीत नेहरू व पटेल यांच्यामध्ये मतभेद आहेत याचे खंडन केले आहे.

महात्मा गांधीजींच्या कालखंडात जे महत्वपुर्ण नेतृत्व देशाला मिळाले की, ज्यांनी भारताची एकता, समृध्दी मान – प्रतिष्ठा यांसाठी अजोड कार्य केले. त्यामध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांचे योगदान श्रेष्ठ आहे. असे म्हटल जात की, भारताच्या बाबतीत सरदार पटेल यांनी घर (देश) सांभाळले आणि पंडीत नेहरूंनी घरापासून दूर राहून पुर्णपणे निश्चित राहून आंतरराष्ट्रीय क्षेत्रामध्ये देशाची प्रतिष्ठा आणि मान – मर्यादेचा विस्तार केला. जो एका स्वतंत्र राष्ट्रासाठी अनिवार्य घटक होतो. सरदार पटेल यांनीच अस म्हटल होत की, ज्यामुळे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय एकता, मजबुती आणि प्रतिष्ठेचे महत्व काय आहे त्याचा उपयोग काय आहे. ३१ ऑक्टोबर १९४९ रोजी नवी दिल्ली मध्ये सरदार पटेलांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमात आभार प्रदर्शित करताना ते म्हणाले की, ''मी ईश्वराकडे दिवस – रात्र प्रार्थना करेन की, जे भाव आपल्या मनात भरले आहेत, प्रेम आणि शुभआर्शिवाद तुम्ही मला देत आहात त्याबद्दल मी जोपर्यंत जिवंत आहे तोपर्यंत दिन – प्रतिदिन मी अधिक पात्र होत आहे. परंतू आपला नेता, जो आता परदेशामध्ये आहे. माझ काम तर मर्यादित आहे. माझे काम आहे की, त्यांना मजबुत करणे आणि जोपर्यंत मला शक्य आहे तोपर्यंत मी हे काम करणारच ते (पंडीत नेहरू) आपल्या शक्तीनुसार बाहेर आपली इज्जत, मान – मरतबा वाढवित आहेत. सगळ्या जगात आपला मान वाढला आहे, ते काम सर्वस्वी गांधीजींनी केले आहे. दुसरा आपला आत्ताचा नेता ज्याप्रमाणे प्रामाणिकपणे आणि प्रेमाने बाहेरदेशी काम करत आहे, त्यामध्येही आमची इज्जत वाढली आहे. परंतु सरतेशेवटी आम्हाला आमच्या मायभूमीची इज्जत वाढवायची असेल, तिचे संरक्षण करायाचे असेल, तर त्यासाठी आम्हाला आपले घर प्रथमत: व्यवस्थितपणे सांभाळावे लागेल. ज्याचे घर व्यवस्थित नाही त्याला बाहेर किंमत नाही असे कुटूंब जास्त दिवस चालु शकत नाही'' यावरून सरदार वल्लभभाई पटेल यांची विचारसरणी आणि राष्ट्राप्रती प्रेमभाव आपल्या लक्षात येतो. त्यांचे खरे रूप हे आजचा भारत देश आहे. भारताच्या एकतेमध्ये भारताच्या अखंडीततेमध्ये आणि भारतीय राष्ट्राला स्थायित्व देण्यासाठी अनेक प्रयत्न सरदार वल्लभभाई पटेल यांनी केले आहेत.

## ३. समारोप :

स्वातंत्र्याच्या आंदोलनात महत्वाची भुमिका बजावणाऱ्या सरदार वल्लभभाई पटेल यांना देश स्वातंत्र्य झाल्यानंतर गृहमंत्री पद देण्यात आले. भारतात सामील होण्यास नकार देणाऱ्या संस्थानांनवर सैनिक कारवाई करून त्यांनी आपल्यातील पोलादी पुरूष दाखवून दिला. १५ डिसेंबर १९५० रोजी त्यांचा मृत्यू झाला. सरदार वल्लभभाई पटेल यांना मृत्यूनंतर भारत सरकारने 'भारतरत्न' या पुरस्काराने सन्मानित केले. ''बहुसंख्यांक आपली जबाबदारी ओळखत नसतील तर हे देशाचे दुर्भाग्य असेल. जर मी अल्पसंख्यांक समुदायाचा असतो तर हे विसरून गेलो असतो की मी अल्पसंख्यांक आहे'' हे सरदार वल्लभभाई पटेल यांचे प्रसिध्द वाक्य आहे. देशाची एकता आणि स्वातंत्र्याचे रक्षण करणे हेच त्यांच्या जीवनाचे लक्ष्य होते. नाविकांच्या विद्रोहाला देखील त्यांनीच इशारा देऊन शांत केले. घटनासभेत देखील देशाची एकता भंग पावू नये याची दक्षता त्यांनी घेतली. देशाचय एकतेसाठीच हिंदीला राष्ट्रभाषेचा दर्जा देण्यात आला. त्याचबरोबर सोमनाथ मंदीराचा जीर्णोध्दार करून लयास गेलेले वैभव पुन्हा मिळवून देण्याचे कार्यही सरदार पटेलांनीच केले. सरदार पटेलांच्या ठिकाणी अनेक गुणांचे मिश्रण होते त्यामुळे ते चिरंतन स्मरणात राहतील यात शंकाच नाही.

## संदर्भ ग्रंथ सूची :


१) कृष्णा बलराज (अनुवाद – दातार भगवान) सरदार वल्लभभाई पटेल,
रोहन प्रकाशन, पुणे

२) डंके निशा, सरदार वल्लभभाई पटेल, अमोल प्रकाशन, पुणे

३) गांधी राजमोहन (१९९०) ''पटेल एक जीवन'' नवजीवन प्रकाशन

४) वृत्तपत्र –
लोकसत्ता – सरदार वल्लभभाई पटेल : एक मुत्सद्दी नेतृत्व, २२ ऑक्टोंबर २०१५

५) Saggi P. D. "A Nation's Homage, Life and work of Sardar Vallabhbhai Patel" Overseas Pulblishing House, Bombay - 01